चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१५ एप्रिल, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# प्रेस नोट

राजुरा येथील खाजगी संस्थेच्या वस्तीगृहात मुल—मुली शालेय शिक्षणाकरीता वास्तव्यास आहे. दिनांक ०६/०४/२०१९ रोजी वस्तीगृहातील दोन अल्पवयीन मुलींची प्रकृती अचानक बिघाडल्याने त्यांना राजुरा येथील रूग्णालयात भरती करण्यात आले होते. मात्र तेथे प्राथमिक उपचार करून लगेच जिल्हा सामान्य रूग्णालय येथे त्यांना हलविण्यात आले. परंतु तेथील उपचारास देखील मुलींची प्रकृती प्रतिसाद न देत असल्याचे पाहुन स्त्रिरोग तज्ञाद्वारे त्यांचा उपचार करण्यात आला. स्त्रीरोग तज्ञाद्वारे तपासणी दरम्यान सदर मुलींसोबत काही अनुचित प्रकार घडला असल्याची शक्यता दर्शवुन सहायक प्रकल्प अधिकारी, चंद्रपुर यांच्याद्वारे तात्काळ पोलीस स्टेशन राजुरा येथे अप.क्र. १८५/२०१९ कलम ३७६(अ)(ब) भादंवि सहकलम ४ बा.लै.अ.प्र.कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

प्राथमिक स्वरूपात अनुचित प्रकार घडला असल्याबाबत सखोल चौकशी व तपास करण्यात आला. चौकशी दरम्यान समोर आलेल्या प्राथमिक तत्थ्यानुरूप व मिळालेल्या गुन्हयासंदर्भात परिस्थितीजन्य पुराव्यानुसार सदर गुन्हयामध्ये ॲट्रासिटी ॲक्ट अन्वये कलम वाढ करण्यात आली. तत्पुर्वी दिनांक १३/०४/१९ रोजी वस्तीगृह अधीक्षक १) छबन पांडुरंग पचारे वय ४४ रा. रामनगर कॉलनी राजुरा, तसेच दिनांक १४/०४/१९ रोजी सहायक अधीक्षक २) नरेंद्र लक्ष्मण विरूटकर वय ४० रा. रामनगर कॉलनी राजुरा या दोन आरोपींना अटक करण्यात आले, अटक आरोपींताची दिनांक २०/०४/२०१९ पर्यंत पोलीस कोठडी घेण्यात आली आहे.

सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवुन पुढिल तपास उपविभागीय पोलीस अधीकारी श्री. शेखर देशमुख, उपविभाग राजुरा यांचेकडे देण्यात आला असुन प्रकरणाची सर्वांगाने सखोल चौकशी करण्याकरीता तपासी अधिकारी यांचे मार्गदर्शनात चार पथके नियुक्त करण्यात आली आहे. सदर प्रकरणाचा पुढिल तपास सुरू आहे.

———————————————————————————————